महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २२४ वा | दिनांक : ०१/०७/२०२५ | वार : मंगळवार

## राज्यात गरीब, दुर्लक्षित समाजावर अन्याय : जयंत पाटील यांचा आरोप



**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले आहे. परिणामी, राज्यात गरीब व दुर्लक्षित घटकांवरील अन्याय वाढला आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोमवारी केला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यावरून माजी अर्थमंत्री तथा शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी त्यांच्यावर निशाणा साधला. ते सरकारला धारेवर धरत म्हणाले, सरकारला आता अर्थसंकल्पाचे संतुलन राखणे अवघड झाले आहे. त्यामुळे राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे. सद्यस्थितीत राज्याचे आर्थिक संतुलन पूर्णतः ढासळले आहे. यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होत आहे.

एससी, एसटी, ओबीसी यांच्यावर होणारा खर्च कागदावर दाखवला जातो हे ३१ मार्चला कळते. पण प्रत्यक्षात त्यावर काहीच पैसा खर्च झाला नाही. तीच पुनरावृत्ती यंदा हे सरकार करत आहे.

जयंत पाटील पुढे म्हणाले, चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केल्याचा उल्लेख मी केला होता. त्यावेळी महसुली तूट ही ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची होती. राज्याच्या अर्थमंत्र्यांनी आज पुन्हा पुरवणी मागण्या माडल्या. त्या ५७ हजार ५०९ कोटींच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्यामुळे या मागण्या मंजूर होतील. त्यावेळी सरकारला १ लाख ३ हजार ४०० कोटी कमी पडणार आहेत. पूर्वीच्या व आताच्या पुरवणी मागण्या मिळून सरकारने अजून एक विक्रम रचला आहे. पुरवणी मागण्या मांडायच्या आणि ते पैसे खर्च करायचे नाही असा प्रकार या सरकारने सुरू केला आहे.

यापुढे हिवाळी अधिवेशन येणार आहे. त्यानंतर पुढचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी आणखी एक पुरवणी मागणी येणार. याचा अर्थ हे सरकार राज्याची महसुली तूट दीड किंवा २ लाख कोटींपर्यंत पोहोचवेल. याचा अर्थ असा की, सरकारला सर्व आकडे कागदावर दाखवणे आवश्यक आहे. अन्यथा ज्यांच्याकडून पैसे घेतले आहेत किंवा ज्यांचे देणे बाकी आहे, असे लोक एकतर आत्महत्या करतील अन्यथा यांच्या मागे लागतील. त्यामुळे सरकारने राज्याच्या अर्थकारणामध्ये एवढ्या मोठ्या तुटीपर्यंत पोहोचण्याचे धाडस केले आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

## भाजपला मिळणार नवा प्रदेशाध्यक्ष



**मुंबई** : भारतीय जनता पक्षाला लवकरच नवीन प्रदेशाध्यक्ष मिळणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जागी आता प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती होणार आहे. यासाठी रविंद्र चव्हाण यांनी आपला अर्ज केंद्रीय निरीक्षक किरेन रिजुजी यांच्याकडे दाखल केला आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह राज्यातील भाजपचे प्रमुख नेते उपस्थित होते. १ जुलै रोजी संध्याकाळी भाजपच्या नव्या प्रदेशाध्यक्षांच्या नावाची घोषणा होणार आहे.

चंद्रशेखर बावनकुळे हे राज्य मंत्रिमंडळात मंत्री झाल्यानंतर रवींद्र चव्हाण यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. भाजपच्या वतीने त्या दृष्टिकोनातून सर्व पावले देखील उचलण्यात येत होती. रवींद्र चव्हाण यांच्याच नेतृत्वातच अनेक पक्षप्रवेश राज्यात होत आहेत. आता रवींद्र चव्हाण यांनी अर्ज दाखल केला असून, यांच्या अधिकृतरित्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या नियुक्तीची घोषणा एक जुलै रोजी होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना रवींद्र चव्हाण यांची स्तुती केली. राज्याच्या प्रदेशाध्यक्षपदासाठी निवडणूक सुरु झाली आहे. यासाठी केंद्रीय मंत्री किरण रिजिजू आले आहेत. त्यांच्या समोर आम्ही रविंद्र चव्हाण यांचा प्रदेशाध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला आहे. जे यापूर्वी मंत्री होते, त्यांनी युवा मोर्चाचा कार्यकर्ता म्हणून कामाला सुरुवात केली होती, त्यानंतर ते नगरसेवक झाले, नंतर आमदार झाले. आज प्रदेशाध्यक्ष पदासाठी आम्ही त्यांचा अर्ज दाखल केला आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, मागच्या काळात चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून अतिशय चांगले काम केले आहे, त्यांनी चांगल्या प्रकारे संघटना बांधली, याचा परिणाम विधानसभा निवडणूकीत दिसून आला. त्यानंतर रवींद्र चव्हाण यांची कार्याध्यक्ष म्हणून काम केले. आज आम्ही त्यांचा अर्ज दाखल केला आहे. उद्या संध्याकाळी त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा होईल.

रवींद्र चव्हाण हे डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. ते २००९ पासून सलग चार वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. अलीकडच्या निवडणुकीत तब्बल ५० हजारांहून अधिक मताधिक्य मिळवत विजयी झाले होते. दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये ते कॅबिनेट मंत्री झाले होते. त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली.

रवींद्र चव्हाण यांच्याकडे भाजपने २००२ साली कल्याण उपजिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी दिली होती. २००५ मध्ये त्यांनी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव करत कल्याण-डोंबिवली महापालिकेत नगरसेवक झाले होते. २००७ मध्ये ते स्थायी समितीचे सभापती झाले. २००९ साली कल्याण विधानसभा मतदारसंघाचे विभाजन होऊन डोंबिवली हा स्वतंत्र मतदारसंघ तयार झाला. त्यानंतर झालेल्या प्रत्येक विधानसभा निवडणुकीत रवींद्र चव्हाण यांनी वर्चस्व मिळवले आणि मोठा विजय देखील मिळवला. त्यानंतर २०१६ साली त्यांना राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आमदारकी मिळवण्याची हॅटट्रीक पूर्ण केली.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये महाराष्ट्र भाजप प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यभार हाती घेतला. ओबीसी चेहरा असणाऱ्या बावनकुळेंच्या नेतृत्वात पक्षाने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत तब्बल १३२ जागा जिंकून अभूतपूर्व यश मिळवले. बावनकुळे यांनी भाजपची स्थानिक पातळीवरील रचना मजबूत केली. १.५ कोटी नवीन प्राथमिक सदस्य व ५ लाख सक्रिय कार्यकर्ते जोडण्यात यश मिळवले. बूथ स्तरापासून ते जिल्हा पातळीपर्यंत संघटनात्मक निवडणुका आणि नियुक्त्यांचे नियोजन केले. यामुळेच लोकसभा निवडणुकीत भाजपला केवळ ९ जागा मिळाल्या असल्या तरी, बावनकुळेंनी त्यातून धडा घेऊन विधानसभा निवडणुकीत बूथस्तरीय व्यवस्थापन करून भाजपला यश मिळवून दिले.

## विरोधकांना एक्स्पोज करताना स्वत: एक्स्पोज होऊ नका : एकनाथ शिंदे

**मुंबई** : मराठी भाषेबाबत आम्ही कधीही तडजोड करणार नाही, मराठी माणसाच्या हक्कांवर गदा आली तर ती सहन केली जाणार नाही, असे विधान राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी केले आहे. मुंबईत पार पडलेल्या शिवसेनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी पक्षातील मंत्र्यांना आणि आमदारांना देखील कानपिचक्या दिल्या. विरोधकांना एक्स्पोज करताना स्वतः एक्स्पोज होऊ नका, असे एकनाथ शिंदे मंत्र्यांना म्हणाले.

शिवसेनेच्या कार्यकारिणीची बैठक आज मुंबईत पार पडली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या मुख्य नेतेपदी निवड करण्यात आली. तसेच शिवसेना नेहमीच मराठी माणसाच्या हक्कासाठी आग्रही असल्याचा ठरावही या बैठकीत संमत करण्यात आला. या बैठकीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना एकनाथ शिंदे यांनी मराठी माणसाच्या उद्धारासाठी सर्वकाही करणार असल्याचा निर्धार केला.

आपण मराठी भाषेबाबत कधीही तडजोड सहन करणार नाही, मराठीची गळचेपी सहन करणार नाही, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. मराठी माणसाच्या उद्धारासाठी जे काही करायचे ते आपण करणार, दिलेला शब्द आपण पाळतो त्यामुळे मराठी माणूस आपल्यासोबत आहे असेही शिंदे म्हणाले.

आपल्यात शिवसैनिक हे पद सर्वात मोठे आहे हे लक्षात ठेवा. कार्यकर्ता हा नेता तयार करतो, पक्ष घडवतो. त्यामुळे कार्यकर्त्याला जपले पाहिजे. एकटा माणूस मोठा होऊन पक्ष मोठा होत नाही. कार्यकर्त्याला मोठं केलं की पक्षही आपोआप मोठा होतो. नेता, आमदार, मंत्री झालो ही हवा डोक्यात जाऊ देऊ नका, कायम कार्यकर्ता म्हणूनच काम करा, असा सल्ला एकनाथ शिंदे यांनी दिला.

दरम्यान, शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्याबद्दल बोलताना खळबळजनक विधान केले होते. नारायण राणे एवढ्या उंचीवर सहजासहजी गेले नाहीत. त्यांनी मर्डर केले, भानगडी केल्या, तुरुंगातही गेले, अशा शब्दांत गोगावले व्यक्त झाले होते. यावरून मोठा वाद निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या भाषणात शिवसेनेच्या मंत्र्यांना आणि आमदारांना कानपिचक्या दिल्या.

आपण कमी बोलू आणि जास्त काम करू तेवढे चांगले. विरोधकांना एक्स्पोज करताना स्वतः एस्पोज होऊ नका. तुमचा चुकीचा शब्द पक्षाला अडचणीत आणतो. आपण एवढे मोठे यश मिळवले ते चुकीचे बोलून घालवू नका. शिस्तीला तडा जाईल असे काही करू नका, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०१ जुलै २०२५


## इको क्लब मिशन फॉर लाईफ अंतर्गत 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात इको क्लब मिशन फॉर लाईफ अंतर्गत 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयाच्या मैदानात प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, डॉ. मीनल श्रीगीरीवार, डॉ.अन्विता अग्रवाल, डॉ. शिला जीरे, पर्यवेक्षक माधुरी भावसार तसेच पालक व विद्यार्थी यांच्याहस्ते इको क्लब मिशन फॉर लाईफ अंतर्गत 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने रोपे देण्यात आली. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांप्रसंगी म्हणाल्या की, आपल्या आईसाठी प्रत्येकाने एक तरी झाड लावलं पाहिजे आणि ते जगवले पाहिजे. जेव्हा आपण त्या झाडाजवळून जाऊ तेव्हा नक्कीच आपल्या आईची आठवण येईल. एक पेड माँ के नाम या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधुरी भावसार यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा. ज्योती मंठाळकर व इको क्लबच्या प्रमुख डॉ. शीला जीरे यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने प्राध्यापक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

## मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा, मुकुंदवाडी 'चावडी वाचन' उपक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा, मुकुंदवाडी येथे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी तसेच सार्वजनिक वाचनाची सवय लागावी या उद्देशाने 'चावडी वाचन' उपक्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. या कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी मा.श्री. ज्ञानदेव सांगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.या उपक्रमात मराठी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी विविध कथा, गोष्टी, मराठी - इंग्रजी कविता , संभाषण, संवाद, नाट्य आणि माहितीपर लेख वाचून दाखवले. विद्यार्थ्यांचा सहभाग उत्स्फूर्त व प्रेरणादायी होता. वाचन करताना त्यांनी आत्मविश्वासाने सादरीकरण केले. सहशिक्षक श्री सचिन गायकवाड यांनी वाचनाचे महत्त्व सांगताना विद्यार्थ्यांना अधिकाधिक वाचन करण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी स्पष्ट केले की वाचनामुळे केवळ भाषिक कौशल्येच नव्हे, तर विचारशक्ती आणि अभिव्यक्तीचेही विकास होतो.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे आणि वाचनाची आवड निर्माण झाल्याचे निरीक्षण करण्यात आले. शाळेतील पालक व सर्व शिक्षकवर्ग यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

## महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची पैठण तालुका कार्यकारणी घोषित



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या पैठण तालुकाध्यक्षपदी सिद्धार्थ सोनवणे आणि पैठण तालुका अल्पसंख्याक विभागाच्या तालुका अध्यक्षपदी इस्माईल शेख यांची नियुक्ती करण्यात आली तर पैठण तालुका संघटक पदी परमेश्वर सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.व पैठण तालुका उपाध्यक्षपदी राजेंद्र राजगुरू, पैठण शहर अध्यक्षपदी भानुदास चाबुकस्वार यांची नियुक्ती करण्यात आली, महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले.महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी राहुल जी.वडमारे यांच्या अध्यक्षतेखाली पैठण येथील हॉटेल दुर्गा 29/06/2025 रोजी बैठक घेण्यात आली. या आढावा बैठकीत जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व उपस्थित पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी यांना येणाऱ्या काळात महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची बांधणी मजबूत कशी करायची गाव तेथे शाखा महाराष्ट्र पक्षाची झाली पाहिजे या सर्व बाबींवर सखोल चर्चा केली व या बैठकी दरम्यान या नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांच्या हस्ते नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीची पत्रे देण्यात आली. यावेळी पक्षाचे जिल्हा सचिव बापूसाहेब चाबुकस्वार यांच्या हस्ते शाल व पुष्पहार टाकून सत्कार करण्यात आला यावेळी प्रमुख उपस्थिती, जिल्हा संघटक रतन जाधव व ज्येष्ठ नेते महेंद्र गवई यांची होती बंडू तांदळे, कैलास साखरे, बाबासाहेब ससाने, प्रभाकर शहाराव,अनिल इंगळे, अमित देशमुख, मुकेश मकासारे, मनोज पगारे, विकास तायडे आदींची उपस्थिती होती.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०१ जुलै २०२५


## विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यास जनसागर लोटला



**बीड :** लोकनेते विनायकराव मेटे यांची जयंती दि. ३० जून सोमवार रोजी त्यांच्या आठवणींना उजाळा देत साजरी करण्यात आली. सकाळपासूनच अभिवादनासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. बीड येथील लोकनेते विनायकराव मेटे स्मृतिस्थळी सकाळी ११ वाजता सामुदायिक अभिवादन कार्यक्रम पार पडला. यावेळी सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह, शिवसंग्रामचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त त्यांचे स्मरण व्हावे, यासाठी आज सकाळपासूनच गावो-गावी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. वस्ती, वॉर्ड, तांड्यावर तसेच ग्रामपंचायत कार्यालय, सामाजिक सभागृह, वाचनालय या ठिकाणी नागरिकांच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. तर बीड येथील त्यांच्या स्मृतीस्थळी त्यांना सर्वपक्षीय सामुदायिक अभिवादन करण्यात आले.

लोकनेते विनायकराव मेटे हे फक्त जिल्ह्याचे नेते नसून त्यांनी उभ्या महाराष्ट्र भर आपल्या सामाजिक कार्यातून दीनदलित, उपेक्षित, वंचित यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले होते. त्यांच्या कार्याची गणना करणे अशक्य आहे. सामूहिक विवाह सोहळ्यातून त्यांनी अनेकांची संसार थाटले, कोविड काळात सर्वसामान्यांना मदतीचा हात दिला, दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले, व्यसन मुक्तीसाठी लढा उभा केला, युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित केले. लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपली उभी हयात समाजासाठी अर्पण करत समाजाच्या लढ्यासाठी घालवली.

मराठा, मुस्लिम, धनगर आरक्षण मिळावे या मागणीसाठी त्यांनी जीवाची पराकाष्ठा केली. आपण "शेवटच्या श्वासापर्यंत मराठा आरक्षण लढा चालू ठेवणार" अशी भीष्म प्रतिज्ञा त्यांनी केली होती आणि त्यांचा शेवटही मराठा आरक्षणावर होवू घातलेल्या मुंबई येथील बैठकीला जाताना झाला. या लढवय्या नेत्याच्या जाण्याने समाज पोरका झाला आहे. अशा बहुआयामी लोकनेत्याला समाज कधीच विसरणार नाही, अशी भावना उपस्थित व्यक्त करत होते.

या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे, शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, अशोक हिंगे, दिलीप गोरे, नारायणराव काशिद, सुभाष जाधव, राजेंद्र मस्के, उल्हास गिरम, बी.बी.जाधव, अनिल घुमरे, रमेश चव्हाण, डॉ. प्रमोद शिंदे, राजाभाऊ मोहाले, नारायणराव थोरात, निवृत्ती डोके, तुळशीराम पवार, उत्तम पवार, ज्ञानेश्वर चौधरी, पंडित माने, प्रमोद कुलकर्णी, महेश वाघमारे, संजय पवार, गोरख शिंदे, राजेश भुसारी, भास्कर गायकवाड, उदय जोगदंड, सुनील शिंदे, नवनाथ प्रभाळे, बाबासाहेब पाटील, लिंबराज वाघ, दोडके फैजी आदींसह शिवसंग्रामचे कार्यकर्ते पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त बीड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अशोक हिंगे, संजय पवार, अतुल लंगोरे आणि सुशील कांबळे यांनी रक्तदान करून शिबिराची सुरुवात केली. या शिबिरात एकूण 62 रक्तदात्यांनी रक्तदान करून मेटे साहेबांना श्रद्धांजली अर्पण केली.

## बीडच्या विनयभंग प्रकरणातील आरोपीसोबत धनंजय मुंडेंचे फोटो



**बीड** शहरातील खासगी कोचिंग क्लासेसमध्ये 'नीट'ची तयारी करणाऱ्या एका १७ वर्षीय मुलीची छेडछाड व लैंगिक छळ करण्यात आला. या प्रकरणी दोन शिक्षकांना अटक करण्यात आली आहे. विजय पवार आणि प्रशांत खाटोकर अशी त्यांची नावे आहेत. परंतु, यावरून आता बीडमधील राजकारण तापत असल्याचे दिसत आहे. माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी या प्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर यांच्यावर आरोप केले आहेत.

धनंजय मुंडे यांनी या प्रकरणावर पत्रकारांशी बोलताना संदीप क्षीरसागर यांच्यावर आरोप केले आहेत. ते म्हणाले, आरोपींवर गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक आमदार संदीप क्षीरसागर हे आरोपी सोबत होते. त्यांचे सीडीआर काढा आणि एसआयटी मार्फत संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी आपण केली असून यासंदर्भात मुख्यमंत्र्यांची देखील भेट घेतली.

प्रस्तुत प्रकरणात अनेक धागेदोरे आहेत. किती वाजता कोण कुठे होता? व फोन कसे गेले? हे तपासून पहावे लागेल. हे प्रकरण सीडीआर चेक करण्याइतपत आता राहिले नाही. या प्रकरणी सीडीआर प्लस आयपीडीआर चेक करावे लागतील. त्यानंतरच खरा गुन्हेगार व त्याच्यावर वरदहस्त असणाऱ्या गुन्हेगारांचा चेहरा पुढे येईल, असे धनंजय मुंडे म्हणाले.

या पत्रकार परिषदेनंतर आता धनंजय मुंडे यांचेच फोटो आरोपी विजय पवारसोबत व्हायरल झाले आहेत. खासदार बजरंग सोनावणे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला आहे. आमदार धनंजय मुंडे यांनी संदीप क्षीरसागर यांच्यावर आरोप केले आहेत. परंतु, आरोप करणे सोपे आहे ते सिद्ध होणे गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया सोनावणे यांनी दिली आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०१ जुलै २०२५


## बीडमधील विद्यार्थिनीचा लैंगिक छळ प्रकरणी कठोर कारवाई करा - पंकजा मुंडे



**बीड :** उमा किरण कोचिंग क्लासेसमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा लैंगिक छळ करणाऱ्या आरोपी विरुद्ध कठोर आणि कडक कारवाई करा, अशा सूचना मंत्री पंकजा मुंडे यांनी बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कौवत यानं दिल्या आहेत. पंकजा मुंडे यांनी नवनीत कौवत यांच्याशी फोनवर चर्चा केली असून संपूर्ण घटनेची माहिती घेतली आहे. ही अतिशय संतापजनक आणि जिल्ह्याला काळिमा फासणारी घटना असून शिक्षकांचे हे कृत्य गंभीर स्वरूपाचे आहे, अशी संतप्त भावना पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

उमा किरण कोचिंग क्लासेसमधील शिक्षक प्रशांत खाटोकर आणि विजय पवार या दोघांनी एक १७ वर्षीय विद्यार्थिनीचे लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक घटना बीडमध्ये घडली आहे. नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय मुलीची छेडछाड आणि लैंगिक छळ प्रकरणी दोघांवर पोक्सो अंतर्गत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित मुलीने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत असे म्हटले आहे की, मी संत भगवान बाबा उच्च माध्यमिक महाविद्यालय, खरवंडी कासार येथे ११ वीचे ॲडमीशन घेतले असून एप्रील २०२४ मध्ये उमा किरण कोचिंग क्लासेस येथे नीटचे क्लासेस लावले होते. सकाळी ०९.०० ते १२.०० पर्यंत उज्वल अभ्यासिका येथे अभ्यासीका लावली होती व तेथे मी नेहमी अभ्यास करण्याकरता जात असायचे. जुलै २०२४ पासून प्रशांत खाटोकर १२ वाजता अभ्यासिकेच्या बाहेर यायचे आणि माझ्यासोबत गाडीवर चल असे म्हणायचे. मी त्याला नाही म्हणायचे.

पुढे तक्रारीत असे म्हटले आहे की, क्लासेसचा टाईम दुपारी २ ते दुपारी ६ पर्यंत असायचा. मी तेथे क्लास रेग्युलर करत होते. प्रशांत खाटोकर सर जे फिजिक्स शिकवतात, ते मला क्लास संपल्यानतर तेथील केबिनमध्ये एकटीला बोलवून ते माझी कीस घ्यायचे, माझ्या छातीला व गुप्त अंगाला बॅड टच करायचे. अंगावरील कपडे काढायला लावून माझे ते फोटो काढायचे. कधी कधी ते क्लास संपल्यानंतर क्लासरुममध्ये कोणी नसताना तिथे सुध्दा ते मला किस करायचे व छातीला व इतर अंगाला बॅड टच करायचे. ते असे माझ्यासोबत वारंवार करत असायचे. मला धमकी द्यायचे की, तू जर घरी कोणाला सांगितले तर मी तुला मारुन टाकेन.

दरम्यान, या प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी देखील प्रतिक्रिया देत आमदार संदीप क्षीरसागर यांच्यावर आरोप केले आहेत. त्यांनी ट्विट करत म्हटले की, बीड जिल्ह्यात झालेल्या अत्याचारावर अतिशय धक्कादायक माहिती पुढे येत आहे. त्या कोचिंग क्लासच्या मालकाला आमदार संदीप क्षिरसागर पादोपदी मदत करायचे? त्यांचा राजाश्रय होता ह्यांना? किती किळसवाणी. या प्रकरणात सुद्धा सक्त कारवाई होणे गरजेचे आहे. सगळ्या सीडीआरची तपासणी झाली पाहिजे, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे.

## एसटी तिकीट बुक करणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी : प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सूट मिळणार





**मुंबई :** लांब आणि मध्यम अंतराच्या एसटी प्रवासासाठी आता प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. एसटी महामंडळाने १५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना १ जुलैपासून सर्वसामान्यांसाठी लागू होणार असून, दिवाळी व उन्हाळी सुट्टीच्या गर्दीच्या काळात मात्र ती लागू राहणार नाही. ही सवलत फक्त पूर्ण तिकीट धारक प्रवाशांनाच मिळणार असून सवलत धारक योजनेच्या प्रवाशांना ती लागू होणार नाही.

परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती देत प्रवाशांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. १ जूनला एसटी महामंडळाच्या ७७ व्या वर्धापन दिनी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकीटामध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल अशी घोषणा केली होती. त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी १ जुलैपासून लागू करण्यात येत आहे.

एसटी महामंडळाच्या या निर्णयाचा प्रत्यक्ष लाभ भाविक व चाकरमान्यांना मिळणार आहे. येत्या आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे जाणाऱ्या नियमित बस गाड्यांचे आगाऊ आरक्षण करणाऱ्या भाविकांना तिकीट दरात १५ टक्के सवलत मिळेल. मात्र, सणासुदीच्या काळात चालवण्यात येणाऱ्या अतिरिक्त (जादा) गाड्यांना ही सवलत लागू असणार नाही. त्याचप्रमाणे गणपती उत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांनाही ही सवलत लागू होणार आहे, त्यासाठी आगाऊ आरक्षण अनिवार्य आहे.

मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या 'ई-शिवनेरी' या एसटीच्या वातानुकूलित बस सेवा घेणाऱ्या प्रवाशांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. ऑनलाईन आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना ही सवलत मिळेल. त्यासाठी प्रवाशांनी एसटीचे अधिकृत संकेतस्थळ npublic.msrtcors.com किंवा 'MSRTC Bus Reservation' हे मोबाईल ॲप वापरून आरक्षण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

काही महिन्यांपूर्वी एसटी महामंडळाने १५ टक्के भाडेवाढ लागू केली होती. त्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण होते. मात्र, आता लागू होणाऱ्या १५ टक्के सवलतीच्या योजनेमुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. यामुळे लांब पल्ल्याच्या मार्गावरील प्रवासी संख्येत वाढ होते का? याकडे महामंडळाचे लक्ष लागले आहे.







महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०१ जुलै २०२५

# चळवळ जगणारा माणूस : प्रा. डॉ. शिवाजी हुसे

## १ जुलै रोजी सुप्रसिद्ध कवी, संपादक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. शिवाजी हुसे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने




"तिफण घेऊन निघालो मी ,या उघड्या बोडक्या माळरानावर,विचारांची पेरणी करण्यासाठी.एका दाण्याचे हजारो दाणे करण्यासाठी"...सुखना बचाओ जनआंदोलन या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर"धोंडी धोंडी पाणी दे!!हा प्रातिनिधिक कवितांचा अत्यंत संयत कविता यात आहे.अत्यंत निखालसपणे शिक्षणाची पायवाट शोधत वर्तमानाच्या पाठीवर सदोदित वाचक वचक ठेवत आपला ठणक माथा कायमचं प्रश्नांच्या डसक्या अग्या मोहळातून गाव शिवाराची दाहकता सोसत देशगव्हाण ते वाकुळणी या गावशिवात शालेय शिक्षण झाले.जालना जिल्ह्यातदेशगव्हाण या गावात जन्म.शेतीमातीची सुखना नदीची नाळ कधीचं तूटू दिली नाही.चांगला अध्यापक, प्राध्यापक व्हावा ही मनाची अद्म्य विश्वासनीय इच्छा.राष्ट्रमाता इंदरा गांधी महाविद्यालयातील शिक्षणाने जगण्याची अन् शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.तर शालेय जीवनातच वाकुळणी येथील छत्रपती संभाजी विद्यालयातील ग्रंथालय,रात्रीची अभ्यास शाळा.या मुळे निखळ वाचनमैत्री पुस्तकाशी जुळाली.रोजचे शाळेत येणारे वर्तमानपत्र त्यातील अग्रलेख रविवारच्या अक्षरपुरवण्याने डॉ.शिवाजीराव हुसे यांचे वाचनाचे भरणपोषण केले.पुढे विद्यापीठात एम. ए. मराठी करावे कारण शालेय व महाविद्यालयीन शिक्षणातचं एक सामाजिक सृजनशीलतेचं घडणं झाल्याने विद्यार्थी दशेत विद्यापीठाची अथांग ग्रंथालय त्यात अखंड वाचन करत राहणे, टिपणे काढणे,या अनुषंगाने अभ्यासक्रमा व्यतिरिक्त वाड्मयमंडळ, भित्तीपत्रके विविध वाड्मयीन नियतकालिकात वाचने.त्यातील साहित्याचे वैचारीक, लेखन शेतकरी कष्टकरी मजुरांची होरपळ एकूणच फुले ,शाहू, आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी असलेले चळवळीचे साहित्य वाचन व खरे भेडसावणारे प्रश्न मुखर होतांना आपण साहित्य चळवळ उभी केली पाहिजे.आपलेही काही जीवघेणे प्रश्न आहेत.या प्रश्नांच्या मानगुटीवर बसलेलं असलं पाहिजे.नाहीतरी मुंड्या मोडणारे या वाड्मयीन चळवळीत ही काही नतद्दष्ट लोक आहेत.या चिंतनाचा मागोवा म्हणून त्यांनी मनाची आरोळी ठोकली तिचं नांव होता.दंवडी प्रातिनिधीक कवितासंग्रह. पदरमोड करुन मनाचा तळ ढवळून ही सविनय दंवडी(दौंडी)म्हणजे डॉ.हुसे सरांची ज्ञानप्रज्ञा होती.त्यांचा नियतकालिकांचा संघर्ष कायमचं राहिला.तो प्रयत्न नोकरी सांभाळीत पदरमोड करीत सतत करीत राहिले तत्कालीन कारण असे की,युजीसीच्या अंतर्गत शोध निबंध यासाठीचा आटापिटा मन पिळवटून टाकणारा होता.मनात ठिणगी पेटलीचं होती.आपण कुणबाऊ माणसं.आता आपणचंहे धस्कट पेटून दिली पाहिजे.पेरणी करायची तर तिफण ही एक सृजनशील अभिव्यक्तीचं अवजार आहे यावर फक्त विचार आचार आणि संस्कार ही शिदोरी कायमचं जगण्याच्या चळवळीला उभारी देते.फक्त चाड्यावर मुठ धरायची अन् सम्यक सकारात्मक विचारधाराची पेरणी करायची.तिफण आली.तिफणीला दिल्लीचं नोंद प्रमाणित पत्र मिळालं.(ISSN)नामांकनाची दखल घेतली.आज अवघ्या महाराष्ट्रातील वाड्मयीन नियतकालिकात तिफणचे विशेषांक प्रकाशित होऊन पुणे,मुंबई ,नाशिक, हैद्राबाद ,व विद्यापीठीय स्तरावर तिफणचा अत्यंत संशोधन पत्रिका म्हणून गौरव होतोच आहे.अनेक साहित्यिक विचारवंत विशेषांक म्हणून ख्यातकीर्त झाले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर,यशवंतराव चव्हाण,बा.भो. शास्त्री लोककवी वामन दादा कर्डक,लोककवी शंकर बडे डॉ वासुदेव मुलाटे, डॉ गंगाधर पानतावणे, डॉ विठ्ठल वाघ,डॉ कैलास दौंड, बाबाराव मुसळे,बापू बिरू वाटेगावकर, बोली भाषा, झाडीपट्टी रंगभूमी, नदी विशेषांक या विशेषांकासाठीचा प्रचंड मेहनत घेऊन एक सामाजिक दायित्वाची भावना यात होतीचं प्रासंगीकता असताना जयंती पुण्यतिथीचे औचित्य साधून त्यांच्यातला साक्षेपी संपादक हा कायम अस्वस्थ राहिला आहे.सविनय सार्थकता सांगताना हे संपादनाचे काम महाकठीण आहे.कवी, सामाजिक चळवळीचे भान व जान असलेले शिवाजीराव हुसे जेंव्हा तिफणचा अंक हाती येतो तेंव्हा ते कटी खांद्यावर घेऊन घरापर्यंत त्याची सन्मानाने मिरवणूक काढून पुन्हा वर्गणीदारांना पाठविण्याचे कार्य सुरू करतात.यावेळी त्यांच्या मनात एक प्रचंड आत्मिक समाधानाच्या लक्ष पाखरांचे थवे रानभर उडत असतात हा अनुभव त्यांच्या डोळ्यातून अनेकांनी पाहिला आहे.लोकसाहित्यातील वाद्ये या विषयीचा अंक हा अनोखा ठरणार आहे.टमकी, ढोलकी,बुलबुल चौंडकं, तुणतुणं,खंजीरी,डफडे,हलगी,ताऱ्या,डफ,तबला,बासरी,पावा,सारंगी,धुंमडं,मृदंग टाळ,चिपुळ्या, पखवाज,अशा अनेक विध्द वाद्यांचा मागोवा घेऊन त्याची जातक कथा सांगणारे लोकं आणि त्यांच्या मुलाखती हा अतिशय मौलिक विशेषांक ठरेल.थांबला तो संपला. पायाला एक अनामिक हुरहुर आणि सामाजिक सृजनशीलतेची ओढ.अगोपांगी एक संयत मनोभूमिका घेऊन जगणारा कार्यक्षम साहित्यिक कार्यकर्ता.कधीचअभिनिवेश नाही.या साऱ्या समाजभान कृतीतून एक निस्सीम भक्ती म्हणजे आपल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत राहणे.अनेक विद्यार्थी कवी कथाकार नाट्यलेखक म्हणून लौकिकास पात्र ठरले आहेत.कन्नड तालुक्याची तिफण साहित्य चळवळ अवघ्या महाराष्ट्राची झाली आहे. महाराष्ट्रा बाहेरही पोहचवली.त्याचे कारण तिफण कविता महोत्सवाचे ग्रामीण भागात गाव पारावर, गाव शिवारात अतिशय उत्तम देखण्या स्वरूपात माय मातीचा जागर करीत ही सविनय चळवळ सर्वव्यापक झाली आहे.महाराष्ट्रातील ख्यातनाम कवी, गीतकार यांच्या अध्यक्षतेखाली अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक काव्य महोत्सव साजरे होतात.एक साक्षेपी संपादक समीक्षक कवी आणि अभ्यासू विवेचक म्हणून त्यांची मौलिक अधिष्ठानाची नोंद घ्यावी लागते.आणि संस्कारमूल्य गाव शिवारातील निसर्गाशी असलेलं नातं हे अतिशय सुरेख असं आहे.वळन वाट वाकडी करून काट्या कुपाट्यातून, दोन्ही वखर हानीत असेल कुणी पळहट्या उपटीत असेल,कुणी सरकी लावत असेल,तर कुणी रस्त्यावर जांभूळ विकणारी माय माऊली असेल या साऱ्या आंतरिक जिव्हाळ्याचा आत्मिक प्रश्न घेऊन सृजनशील भावनेचा आदर करीत डॉ.हुसे सर त्यांच्या मनाचा आणि जगण्याच्या संघर्षाचा ठाव घेतात यातून त्यांची सामाजिक सृजनशीतेची चळवळ आणि माणसा विषयीची माणुसकीची निष्ठा नितळ निर्लेप साधकाची वाटून जाते.माणुसं जगतो कशासाठी? केवळ अन्न वस्त्र निवारा नसून ज्ञान ही मुलभूत गरज आहे.तुमची मुलं शिकली पाहिजे तंत्रज्ञान कुशलतेत तरबेज झाली पाहिजे.गावखेड्यात आज प्रचंड झगमगाटी झपाटलेपण येतं आहे.जनावरांच्या विषयी ही मोठ्या अंतर्मुख होऊन आत्मियतेने ते विचारना करतात.गायगोठा,सप्पर,झोपडं,खोपी,गावा ठाण,चारा वहळाया,पेंढी,कडबा,या साऱ्या विषयी ते जाणिव पुर्वक मनस्वी विचारना करतात.यासाठी चळवळ उभी राहिली पाहिजे. पशुसंवर्धन ते दुग्धव्यसाय या विचाराने ते समकालीनात प्रचंड आत्मिक्तेने गाव माणसांशी विचारना करीत राहतात कधी खळ्यावर,कधी मळ्यावर,कधी सुखना काठावर कवी संमेलन घेतात.मुळ आपल्या मायमातीची जुनी जाणती वयस्क व्यक्तींच्या पुर्वकालीनआयुष्याचा उजाळा घेत ते एक शेल्फी घेतात.असं एक अवलिया व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ.शिवाजी हुसे सर,.अमळनेर येथे जाऊन पुज्य साने गुरुजी यांच्या पावन भूमीला भेट देणे.तिथल्या मातीचा मृदगंध मनाला स्पर्शून घेणे. श्रध्देय लोकनेते गोपीनाथजी मुंढेसाहेब यांच्या पावन पदस्पर्शाला नतमस्तक होणे.बालभारती पुणे स्थित ही स्पर्श जाणीव तर सहृदयी आहे.बालपणी जी अभ्यासलेली पुस्तके इथून येतात त्यांच्या जन्माची कथा अंतरंगी घेऊन हा मनोज्ञदर्शक हळवा माणूस पंख फुलांनी प्रफुल्लित होऊन मनाची मशागत करीत अहोरात्र तिफण संपादनची धुरा घेऊन एक मायबोलीचा सच्चा सच्चिदानंद होऊन मनस्वी आनंद घेत निघतो.हा स्वभाव त्यांच्या निस्सीम भक्तीचा आदराचा मनोगंध आहे.साहित्यिक शैक्षणिक अनुबंध:- साहित्याचे संशोधन करून विद्यावाचस्पती पदवी संपादन करण्यासाठी साहित्य विषयाची धिरोदत्त मांडणी करत अनेक संशोधकीय शोधनिबंध तिफण मध्ये संपादित आहे.हा वाड्मयीन ठेवा तर आहेच त्याचबरोबर या वाड्मयीन परिप्रेक्ष्यातून जी संयत विद्रोहीची भूमिका म्हणजे त्यांचे कवितासंग्रह आहेत."बाप झाला कासाविस"या कवितेमधून बापा विषयीची शेती मातीशी असलेली नाळ कायमच हृदयस्थानी आहे, पण सालोसाल होणारी होरपळ म्हणजे ही कुणबाऊ बापाची कासाविस.महाविद्यालयीनविद्यार्थी दशेत "सखी आणि पाऊस"मनाची हौस स्वप्नवत शब्दगंधाने पुलकित झालेली कविता ही डॉ.शिवाजी हुसे सरांची तत्कालीन हिरव्या मनाची बोली आहे.पुढे आपल्या गावाच्या वाटा दुर दुर देशी होऊन जातात.देश-गव्हाण.देशीवानचं बीज पेरून रान शिवाराची ओटी भरायची.इथल्या बेभरवशाच्या कुणबीकीने गावाची दशा केली म्हणून "वेदनांचा गावं"हंबरडा फोडून व्यक्त करण्याची मुक्त कविता संयत विद्रोह पेरत येते.मुक्काम देशगव्हाण या गावाच्या अंगणातून,वट्या वस्तीतून,जोत्या पाळूला पाय धुऊन जाणारी 'सुखना नदी'म्हणून "सुखना मायची कहाणी"या कवितेमधून आज उद्या काल ही सखेद संवेदना मन हेलावून टाकते.या साऱ्यावर कडी म्हणून कवी प्रखर वास्तववादी चिंतन चिकित्सक भावनेतून म्हणतो "आता युद्ध अटळ आहे"या कवितेचे आत्मा हा प्रचंड उद्विग्न होऊन आता रूम्हणं हाती घेतलचं पाहिजे.केवळ भळभळणारी जखमच वाट्याला कायम आल्याने.ही कविता गातो लिहितो जसे"गावाकडची गाणी"ही वेदनेची ही गाऱ्हाणं गाणी आहेत."तर पाण्यासाठी दंगली होतील"ही समकाल अतिशय संवेद प्रश्नावर भाष्य करणारी कविता.पाणी हे जीवन मग तडफडून मरण्यापेक्षा हा घोटभर पाणी दंगली पेटवल्या शिवाय राहणार नाही.असे अनेकविध चिंतन संशोधक चिकित्सक समक्षेत्रन संत गाडगेबाबांचे अखरेच किर्तन, शिक्षणव्रती भूमीपुत्र,ही चरित्रात्मक पुस्तक ही मोठी अभ्यासकीय ठेव झाली आहे.कवितेचा वाटा, भाकर,काव्यार्थ, काव्यशिल्प,ही अतिशय लक्षवेधी पुस्तके लेखक डॉ. शिवाजी हुसे सरांचे महत्वाचे अधिष्ठान आहे.आलीकडेचं ख्यातनाम साहित्यिक "बाबाराव मुसळे यांचे साहित्य संदर्भ आणि समीक्षा"हा आत्मिक अंतरंगी साहित्य गौरवाचा परिपाक झाला आहे."तुकोबा चिंतन आणि समीक्षा"या वाड्मयीन अधिष्ठान असलेल्या तुकोबांच्या पालखीची पालखी सोहळाच हुसे सरांनी अधोरेखित केला आहे.त्याच प्रमाणे "बापू बिरू वाटेगावकर" विवेकी माणूस गरीबांचा कैवारी माजूऱ्यांचा कर्दनकाळ हे व्यक्तिचित्रणाचं लेखन अतिशय मनस्वी झाले आहे. संत भगवान बाबा यांचे लघू चरित्र ,एक संशोधक प्राध्यापक साक्षेपी संपादक म्हणून "कन्नड भागातील भिल्लांच्या लोकगीतांचा अभ्यास"हा अभ्यासपूर्ण साहित्य एक दस्तऐवज ही एक आजच्या ग्रामीण वास्तवाची ठेव आहे.भूमिपुत्रांच्या कवितेचा मर्मग्राही अनुबंध हा तिफणचं आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात अभ्यासमंडळाचे सदस्य, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभाग.राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात अनेकदा निबंध वाचन सहभाग, संशोधन पत्रिकेत अनेक निबंध प्रकाशित.महाराष्ट्रातील वाड्मयीन अधिष्ठान प्राप्त असलेला भि.ग.रोहमारे पुरस्कार व अनेक मान्यवर संस्थेचे पुरस्कार,शेष मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, अनेक कवी संमेलनामध्ये सहभाग. विद्यार्थी चळवळ, नदी संवर्धन चळवळ, वाङ्ममयीन चळवळ, ते शेतकरी चळवळीत विचारांचेअधिष्ठान घेऊन सृजनशील जागर उजागर करणारे कार्यकर्ते, उभं आयुष्य चळवळीसाठी समर्पित करून उपेक्षितांना न्याय मिळवून देणारे, प्रस्थापित व्यवस्थेच्या विरुद्ध संघर्ष करणारे चळवळ जगणारे सन्मित्र कवीवर्य साक्षेपी समीक्षक संपादक डॉ शिवाजी हुसे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**डॉ. प्रभाकर शेळके**
**जालना संवाद:-9975137337**